# V J T I

**Veermata Jijabai Technological Institute**
(Central Technological Institute, Maharashtra State, INDIA)
H. R. Mahajani Marg, Matunga, Mumbai 400019
Tel.No. +91 22 24198100 Fax: +91 22 24102874
www.vjti.ac.in


क्र.लेखा/शिवृ./अर्ज भरणे/२०२०-२१/ ११२० /२०२० दिनांक:०९/१२/२०२०

9 DEC 2020

## परीपत्रक : शिष्यवृत्ती कार्यासन

### शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता शिष्यवृत्तींचे अर्ज भरण्याकरीता सूचना :

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना **(OPEN, SEBC & EWS)**
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना **(OPEN, SEBC & EWS)**
३) अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती (राज्य शासन) **(Muslim , Sikh , Buddhist , Christian , Parsi , Jain and Jews)**
४) भारत सरकार शिष्यवृत्ती व फ्रीशीप योजना **(SC, ST, OBC, SBC,VJ-NT A-B-C-D)**
५) भारत सरकार दिव्यांग शिष्यवृत्ती योजना **(Only Hadicapped Students)**
६) गुणवान विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य योजना **(FMS)**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता संस्थेतील सर्व पदवी, पदविका, एम.सी.ए., आणि एम.टेक अभ्यासक्रमास शिकत असणाऱ्या **Phisically Handicapped, OPEN, SEBC, EWS, Minority, SC, ST, OBC, SBC** आणि **VJ-NT A-B-C-D** प्रवर्गातील द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ अभ्यासक्रमास शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, सन २०२०-२१ करीता अनु क्र. १ ते ६ मधील सर्व योजनांना अर्ज करण्यासाठी शासनाने दिनांक ०३/१२/२०२० पासून **www.mahadbtmahait.gov.in** हे संकेतस्थळ सुरू करण्यात आलेले आहे. तरी वरील नमूद केलेल्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी आपला **MahaDBT** चा युझरनेम व पासवर्ड वापरून फक्त मागील वर्ष उत्तीर्ण व चालू वर्षाची माहीती **(Current Course Details)** भरावयाची आहे व नंतर पून्हा नव्याने तूम्ही उत्पन्न मर्यादेनुसार ज्या योजनेला पात्र आहात त्या योजनेला अंतिम मूदतीची वाट न पाहता त्वरीत अर्ज करावयाचा आहे. **SC, OBC, SBC** आणि **VJ-NT A-B-C-D** प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी (ज्यांचा गेल्या वर्षीचा अर्ज मंजूर आहे) पुन्हा नव्याने उत्पन्नाचा दाखला काढण्याची गरज नाही. परंतू **OPEN, SEBC, Minority** आणि **ST** प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मात्र नव्याने सन २०१९-२० या वर्षाचा उत्पन्नाचा दाखला काढून **MahaDBT** या संकेतस्थळावर **(Personal Details)** मध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास सदर अर्ज नामंजूर करण्यात येईल.

शिष्यवृत्ती करीता अर्ज केल्यानंतर सदर अर्ज मंजूर झाला आहे किंवा नाही हे तपासून घेण्याची सर्वस्वी जवाबदारी विद्यार्थ्यांची राहील. विद्यार्थ्यांना अर्ज भरताना कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्वरीत संस्थेच्या शिष्यवृत्ती विभागातील कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा. तसेच **www.mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावरील **Grievance/Suggestions** या पर्यायाचासुध्दा वापर करावा. <u>जर एखादा विद्यार्थी त्याच्या निष्काळजीपणाने वरील योजनांचा अर्ज भरण्यापासून वंचित राहून गेल्यास प्रत्येक वर्षे शेवटी त्यांना उर्वरीत खुला प्रवर्ग इतकी फी भरावी लागेल. याची विद्यार्थी/पालकांनी गांभीर्यने नोंद घ्यावी.</u>

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE MATUNGA MUMBAI - 19

अध्यक्ष
शिष्यवृत्ती समिती

09/12/2020

सोबत : शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची माहीतीपत्रक
प्रत : सर्व विभागप्रमुख, विभाग सुचना फलक, वसतीगृह, ग्रंथालय, टिपीओ, संस्थेचे संकेतस्थळ

सोबत ५ पृष्ठे.

V J T I
Veermata Jijabai Technological Institute
(Central Technological Institute, Maharashtra State, INDIA)
H. R. Mahajani Marg, Matunga, Mumbai 400019
Tel.No. +91 22 24198100 Fax: +91 22 24102874
www.vjti.ac.in

9 DEC 2020

2020-21 **शिष्यवृत्ती कार्यासन** 9 DEC 2020

**www.mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावर अर्ज भरण्याकरीता मार्गदर्शक सूचना :

१ **www.mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावर सर्व विद्यार्थ्यांनी नोंदणी केल्यानंतर युझरनेम व पासवर्ड स्वतःच्या ई.मेल वर व्यवस्थीत नोंद करून ठेवावा. कारण एकाच युझरनेम व पासवर्ड ने तुम्हाला दरवर्षी शिष्यवृत्तीचा अर्ज भरावयाचा आहे.

२ **Domicile Certificate** विद्यार्थ्याचे असणे गरजेचे आहे.

३ **Income Detailas** मध्ये नवीन **(Fresh)** विद्यार्थ्यांनी २०१९-२० व नुतनीकरण **(Renewal)** विद्यार्थ्यांनी ज्यावेळी प्रथम अर्ज केला होता त्याच्या अगोदरच्या वर्षाचे **Income Certificate** अपलोड करावे.

४ **ST, OPEN, SEBC & EWS Category** च्या विद्यार्थ्यांना मात्र २०१९-२० या वर्षाचेच **Income Certificate** अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच सदर विद्यार्थ्यांनी दरवर्षी नवीन **Income Certificate** काढणे गरजेचे आहे. मात्र **SC, OBC, SBC & VJNT** विद्यार्थ्यांनी पहिल्या वर्षी जे (ज्या वर्षी या संस्थेतील प्रथम अर्ज मंजूर झाला होता) **Income Certificate** काढले आहे तेच **Income Certificate** अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत ग्राहय राहील.

५ **Past Information** मध्ये प्रथम दहावी, बारावी, आय.टी.आय., पदवी किंवा पदवीका या अनुक्रमाणे माहीती भरावयाची आहे.

६ **Current Information** मध्ये प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष आणि चतुर्थ वर्ष या अनुक्रमाणे माहीती भरावयाची आहे.

७ मगील वर्षाच्या गुणपत्रीका अपलोड करताना विद्यार्थ्यांनी दोन्ही सत्रांच्या **(Both Semester Results)** यांचे एकत्रीत फोटो अपलोड करायचे आहेत.

८ **Allotment Letter** मध्ये विद्यार्थ्यांनी **Final Allotment Letter** अपलोड करावयाचे आहे.

९ **Fees Paid** मध्ये **SC, ST, OBC, SBC & VJNT** विद्यार्थ्यांनी ० इतकी रक्कम भरावयाची आहे. कारण सदर संस्था मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शासनामार्फत मंजूर करण्यात येणारी रक्कम घेतली जात नाही.तसेच **OPEN, SEBC & EWS** विद्यार्थ्यांनी जर फक्त **Tution Fees** ची पूर्ण रक्कम भरली असेल तरच त्यांनी पूर्ण ची रक्कम भरावयाची आहे अन्यथा

1/5

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE MATUNGA MUMBAI-19

तेथे ० इतकी रक्कम भरावयाची आहे. मात्र अपंग शिष्यवृत्ती योजनेकरीता विद्यार्थ्यांनी जेवढी फी भरली आहे तेवढीच फी तेथे टाकावयाची आहे.

१० **Hostel Details** मध्ये जे विद्यार्थी भाडे तत्त्वावर राहत आहेत अशा विद्यार्थ्यांनी संपूर्ण भाडे करारनामा PDF स्वरूपात अपलोड करावयाचा आहे. तसेच जे विद्यार्थी वसतीगृहात राहत आहे त्यांनी वसतीगृहाचे प्रमाणपत्र व ओळखपत्र सोबत जोडून अपलोड करावे.

११ **LC/TC Certificate** मध्ये विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात प्रवेश घेताना जे शेवटचे महाविद्यालय सोडले होते त्या महाविद्यालयाचे **Leaving Certificate/Transfer Certificate** अपलोड करावे.

१२ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना २५६ केबी मध्ये JPG अथवा PDF Type मध्ये व्यवस्थीत कागदपत्र स्कॅन करून अपलोड करावयाचे आहेत.

१३ सर्व OPEN, SEBC & EWS विद्यार्थ्यांना (पुरूष) आणि विद्यार्थीनी (स्त्री) त्या योजनेनुसार प्रतिज्ञापत्र (Undertaking) अपलोड करावयाचे आहे. SC, ST प्रवर्गातील विद्यार्थी / विद्यार्थीनी आणि फक्त OBC, VJNT & SBC विद्यार्थीनींना प्रतिज्ञापत्र (Undertaking) अपलोड करण्याची आवश्यकता नाही.

१४ प्रतिज्ञापत्र (Undertaking) भरताना विद्यार्थ्यांनी त्यामध्ये जसेच्या तसे योजनेचे नाव लिहायचे आहे. तसेच त्यावर दिनांक, ठिकाण, पालकांची स्वाक्षरी तसेच विद्यार्थ्याची स्वाक्षरी असणे गरजेचे आहे.

१५ बरेच विद्यार्थी फी भरल्याची पावती अपलोड करण्याऐवजी बॅकेचे चलन अपलोड करतात. तरी तसे न करता SBI च्या संकेतस्थळावरून फी पावती डाउनलोड करून घ्यावी. तसे न केल्यास सदर अर्ज विद्यार्थ्याला परत पाठवण्यात येईल.

१६ सर्व अर्जांची ऑनलाईन पध्दतीने पडताळणी करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी स्पष्ट दिसणारे कागदपत्र अपलोड करावयाचे आहेत. अस्पष्ट कागदपत्र दिसल्यास सदर अर्ज पुन्हा विद्यार्थ्यांच्या लॉगीन ला पाठवण्यात येतील. विद्यार्थ्यांचे अर्ज बरोबर असल्यास **Desk 1 Verification, Desk 2 Verification** व अपूर्ण किंवा चूकीचा अर्ज असल्यास **Sent Back to Application** अशा प्रकारचे मॅसेज आधार संलग्न मोबाईल क्र वर येतील.

१७ अर्ज **Sent Back to Application** का केला आहे याचे कारण पाहण्यासाठी **My Applied Scheme** मध्ये जाऊन **Application ID** वर क्लिक करावे. व सदर बदल करून विद्यार्थ्यांनी पुन्हा **Scheme** ला **Re-apply** करणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास तुमचा अर्ज संस्थेच्या लॉगिल ला येणार नाही व त्यामूळे सदर अर्ज मंजूर करता येणार नाही परिणामी विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गाइतकी फी भरावी लागेल. तसेच भविष्यात सदर अर्ज ऑनलाईन प्रणालीमधून Reject होऊन जातील व त्यास विद्यार्थी स्वतः जवाबदार राहतील.

१८ विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण येत असल्यास **www.mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळाच्या Grievance/Suggestion या पर्यायामध्ये सदर अडचणी टाकणे.

2/5

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE
MATUNGA
MUMBAI-19.

१९ TFWS मधील फक्त Category च्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. तसेच SPOT ROUND मधील विद्यार्थ्यांना त्यांच्या Original Caste नुसार अर्ज करता येईल.

२० Tuition Fee & Examination Fees या योजनेला अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) जोडणे बंधनकारक आहे.

२१ VJTI Hostel हे शासकीय वसतीगृह नसून खाजगी वसतीगृह (Non-Government Hostel) आहे याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

२२ <u>DBT</u> द्वारे शिष्यवृत्तीची रक्कम कोणत्या बँक खात्यात जमा झाली आहे हे पाहण्यासाठी <u>My Applied Scheme</u> मध्ये जाऊन <u>Fund Disbursed</u> मधील <u>Application ID</u> वर क्लिक करावे.

२३ एखाद्या विद्यार्थ्याने संपूर्ण अर्ज भरला आणि <u>Scheme</u> सुध्दा <u>Apply</u> केले असेल व त्यानंतर अर्जामध्ये पुन्हा काही बदल <u>(Change)</u> करावयाचा असल्यास <u>My Applied Scheme</u> वर क्लिक करून <u>Scheme</u> ला <u>Cancel</u> करावे. तदनंतर तुम्हाला पाहीजे ते बदल करावयास मिळतील.

२४ <u>CAP ID (Allotment Letter)</u> <u>Upload</u> करण्याकरीता विद्यार्थ्यांना <u>Current Details</u> मधील सर्व <u>Information</u> Delete करावी लागेल व पुन्हा नव्याने भरताना माहीती भरताना <u>CAP ID (Allotment Letter)</u> <u>Upload</u> करण्यासाठी <u>Option</u> सुरू होईल.

२५ मागील वर्षाची शिष्यवृत्तीची मंजूर झाली आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी <u>My Applied Scheme History</u> वर क्लिक करावे.

२६ विद्यार्थ्यांनी जो मोबाईल क्रमांक सध्या वापरणार आहेत तो मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्ड क्रमांकाला आधार कार्ड केंद्रातून संलग्न/लिंक करून घ्यावयाचा आहे व ज्या बॅकेत विद्यार्थ्याचे खाते आहे त्या बॅकेत जाऊन NPCI पोर्टलवर आधार कार्ड क्रमांक संलग्न/लिंक करून देण्यासाठी सांगायचे आहे. जर विद्यार्थ्याचा आधार कार्ड क्रमांक NPCI पोर्टलवर लिंक नसल्यास विद्यार्थ्याला तसेच महाविद्यालयाला शिष्यवृत्तीची रक्कम मिळनार नाही. परीणामी होणाऱ्या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी व पालक सर्वस्वी स्वतः जवाबदार राहतील.

२७ ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्या अर्जाची प्रिंट व संबंधीत कागदपत्रे शिष्यवृत्ती विभागात आणून देऊ नये.

२८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची अंतिम तारीख पुन्हा पुन्हा शिष्यवृत्ती विभागात येऊन विचारू नये. जोपर्यंत तुम्हाला ऑनलाईन अर्ज भरता येईल तोपर्यंत विद्यार्थ्यांनी अर्ज भरावयाचा आहे. अर्ज भरण्याची अंतिम तारीख **www.mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावर शासनामार्फत वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येईल. परंतू अंतिम तारीखेची वाट न पाहता विहीत वेळेत विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा जेणेकरून आपले आर्थिक नुकसान होणार नाही याची विद्यार्थी व पालकांनी गांर्भियाने नोंद घ्यावी.

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE
MATUNGA
MUMBAI-19.

# Veermata Jijabai Technological Institute

## DIRECT BENEFIT TRANSFER [DBT]

## Direct link for apply scholarship :- mahadbtmahait.gov.in

| Sr. No | Category | Income | Department | Scheme Name |
|---|---|---|---|---|
| 1 | OPEN, SEBC & EWS | Upto Rs.8,00,000/- | Directorate of Technical Education | Rajarshi Chatrapati Shahu Maharaj Shikshan Shulka Shishyavrutti Yoja (EBC) |
| 2 | OPEN, SEBC & EWS | Upto Rs.8,00,000/- | Directorate of Technical Education | Dr. Panjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna[DTE] |
| 3 | Muslim, Sikh, Christian, Parsi, Jain & Jew | Upto Rs.6,00,000/- | Minority Development Department | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses[DTE] |
| 4 | SC | Upto Rs.2,50,000/- | Social Justice And Special Assistance Department | Government of India Post-Metric Scholarship |
| 5 | SC | Above Rs.2,50,001/- | Social Justice And Special Assistance Department | Post-Matric Tuition Fees and Examination Fees (Freeship) |
| 6 | ST | Upto 2,50,000/- | Tribal Development Department | Post Matric Scholarship Scheme (Government of India) |
| 7 | ST | Above 2,50,001/- | Tribal Development Department | (Vocational Education Fee Reimbursement) |
| 8 | OBC | Upto Rs.1,00,000/- | VJNT, OBC and SBC Welfare Department | Post Matric Scholarship to OBC Students |
| 9 | SBC | Upto Rs.1,00,000/- | VJNT, OBC and SBC Welfare Department | Post Matric Scholarship to SBC Students |
| 10 | VJNT | Upto Rs.1,00,000/- | VJNT, OBC and SBC Welfare Department | Post Matric Scholarship to VJNT Students |
| 11 | OBC | Rs.1,00,001/- To Rs.8,00,000/- | VJNT, OBC and SBC Welfare Department | Tuition Fee & Examination Fees to OBC Students |
| 12 | SBC | Rs.1,00,001/- To Rs.8,00,000/- | VJNT, OBC and SBC Welfare Department | Tuition Fee & Examination Fees to SBC Students |
| 13 | VJNT | Rs.1,00,001/- To Rs.8,00,000/- | VJNT, OBC and SBC Welfare Department | Tuition Fee & Examination Fees to VJNT Students |
| 14 | Only Physically Handicapped | No Income Limit | Social Justice And Special Assistance Department | Post Metric Scholarship for person with disability |
| 15 | AMS Students | Upto Rs.6,00,000/- | Directorate of Higher Education | Assistance to Meritorious Students scholarship - Senior Level |
| 16 | VJNT & SBC (Only Hostelite students) | Upto Rs.1,00,000/- | VJNT, OBC and SBC Welfare Department | Payment of Maintenance Allowance to VJNT and SBC Students Studying in Professional Courses and Living in Hostel Attached to Professional Colleges |
| 17 | SC (Only Hostelite students) | Upto 2,50,000/- | Social Justice And Special Assistance Department | Maintenance Allowance for student Studying in professional courses |

4/5

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE
MATUNGA
MUMBAI-19.

# प्रतिज्ञापत्र

मी श्री. ______________________________

राहणार ______________________________

ता. ____________ जि. ____________ येथील कायम रहिवासी असून मला एकूण ______ अपत्य आहेत. त्यापैकी _____ मुले व _____ मुली आहेत. कुमार ______________________________ हा /ही प्रथम / द्वितीय / तृतीय / चतुर्थ क्रमांकांचा लाभार्थी अपत्य पुरूष आहे. तो/ती वीरमाता जिजाबाई टेक्नोलॉजिकल इन्स्टिटयूट, माटूंगा, मुंबई १९ या महाविद्यालयामध्ये ______________________________ या अभ्यासक्रमांस शिक्षण घेत असून तो ______________________________ या शिष्यवृत्ती योजनेकरीता अर्ज करीत आहे. यापूर्वी माझ्या कुटूंबातील एकूण _____ (पुरूष) अपत्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला आहे. त्यांची नावे

१)

२)

३)

४)

ही आहेत. वर दिलेली माहीती ही पूर्णत: खरी असून त्याची सर्वस्वी जवाबदारी माझी आहे. त्यामध्ये काही खोटे आढल्यास माझ्या पाल्याला मिळणारी शिष्यवृत्ती व्याजासह शासनास परत करील अशी हमी देत आहे. तसेच शासन निर्णयानुसार होणाऱ्या कारवाईस मी व्यक्तीश: जवाबदार असेल.

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

पालकाची स्वाक्षरी

ठिकाण :

दिनांक :

5/5